## आता ‘एआय’ तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली असलेल्या स्मार्ट बसेस

**ठाणे:**- राज्य परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यासाठी ‘एआय’ तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली स्मार्ट बसेस मध्ये लावण्यात येणार असल्याने या नवीन बसेस प्रवासासाठी अधिक सुरक्षित असतील असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे व्यक्त केला.
(पान ६वर)


# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष-४
अंक - ४४
epaper.diwanews.com


www.diwanews.com ♦ सोमवार, २ जून २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## नालेसफाई ही शहर स्वच्छतेची परीक्षा म्हटली तर यात दिवा प्रभाग समिती मधील प्रशासन ‘ढ’ असेच म्हणावे लागेल

# पालिका आयुक्त दिव्यातील नालेसफाईकडे लक्ष देतील काय ?



दिवा शहर हे काही नियोजित शहर नाही.जशी जागा मिळेल तशा पद्धतीने वाढलेलं हे शहर आहे. परिणामी शहरात असणाऱ्या नैसर्गिक नाल्यांची संपूर्ण सफाई दर पावसाच्या आधी होणे गरजेचे आहे. ही वास्तविकता दिवा शहरात काम करणाऱ्या दिवा प्रभाग समितीच्या कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना माहित नाही का ? हा आमचा प्रश्न आहे.जर आपण नालेसफाई ही शहर स्वच्छतेची परीक्षा म्हटली, तर यात ठाणे महानगर पालिकेचे दिव्यातील प्रशासन ढ आहे असेच म्हणावे लागेल.



**दिवा न्यूज रोखठोक**
**सुहास खंडागळे**

**मुळात ज्या शहराचे पालकत्व** तुमच्याकडे आहे. त्या शहराची जबाबदारी काळजीपूर्वक सांभाळणं हे येथील प्रशासनाचे काम आहे. दर पावसाळ्यात दिव्यातील नालेसफाईचा बोजवारा उडतो.रस्त्यांवर आणि बैठ्या चाळीत पाणी साचते. प्रशासन यातून मागील काही वर्षात शिकत नसेल,तर असं प्रशासन दिव्यात हवं कशाला ? हाही प्रश्न आहे.पावसाच्या पाण्याने आपोआप नाले साफ होण्याचे तंत्रज्ञान या अधिकारी आणि ठेकेदारांनी विकसित केले आहे का ?असा प्रश्न या निमित्ताने पडतो.

शहरातील संपूर्ण पाण्याचा निचरा होण्यासाठी दिव्यात असणाऱ्या मुख्य नाल्यांचे खोलीकरण करणे गरजेचे आहे. या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे.

**प्लास्टिकच्या पिशव्या काढून त्या एका ठिकाणी गोळा करून ठेवणे याला नालेसफाई म्हणता येणार नाही.** दिव्यात काम करणाऱ्या नालेसफाईच्या ठेकेदारांना कदाचित हेच वाटत असावे.दर पावसाळ्याआधी नाल्यांमध्ये असणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या गोळा करायच्या आणि त्या नाल्याच्या बाहेर काढून ठेवायच्या... पाऊस पडला की पुन्हा त्या प्लॅस्टिकच्या पिशव्या नाल्यामध्ये पुन्हा वाहून जातील आणि आपली नालेसफाईची हात सफाई होईल, अशा काहीतरी विचित्र जगात येथील नालेसफाई करणारे ठेकेदार आणि अधिकारी वावरताना दिसतात.नाल्यातून बाहेर काढलेला कचरा वेळेत टाकला पाहिजे असं यांना का वाटत नाही.

**गटारातून काढलेला चिखल काही ठिकाणी न उचलला तिथेच ठेवला जातो.** पाऊस पडला की पुन्हा तोच चिखल गटारात जातो... अरे मग तो चिखल काढण्याची तसदी हे लोक का घेतात ?हेच कळत नाही.

दिव्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची चिंता आणि काळजी येथील प्रशासनाला नाही. मागील काही वर्षांचा अनुभव पाहता असंच म्हणावं लागेल. दिव्यात नाल्यांचे खोलीकरण झाल्याचे मागील काही वर्षात आठवत नाही. मशीनच्या सहाय्याने इथे उत्तम दर्जाची नालेसफाई झाले असं एकदाही पहायला मिळालं नाही.

**पाऊस सुरू झाला, पाणी साचायला लागले की जेसीबी घेऊन त्या ठिकाणी जायचं आणि तिथला नाला मोकळा करून द्यायचा** असेच प्रकार दिव्यात पाहायला मिळतात.हे नालेसफाईचे दुर्दैव आहे. नगररचना, नगर विकास याबाबतीमध्ये ठाणे महानगरपालिकेचे दिवा शहराकडे सपशेल दुर्लक्ष झालेल आहे. ठाणे महापालिकेच्या आयुक्तांनी याकडे लक्ष द्यायला हवं. आज दिवा शहराची लोकसंख्या साधारण पाच लाखाच्या घरात आहे.दिवा शहराचा विस्तार हा झपाट्याने झालेला आहे. इतक्या मोठ्या लोकसंख्येचा वावर दिवा शहरात असताना काही मूलभूत प्रश्न या ठिकाणी निर्माण झाले आहेत.

**ड्रेनेजचा प्रश्न निर्माण झाला आहे.इमारतींचे सांडपाणी वाहून न्यायची यंत्रणा अस्तित्वात नाही.**शहरात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात राहत असताना, असलेल्या लोकसंख्येच्या तुलनेमध्ये येथे सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा निर्माण केली गेली का ? याचा विचार महापालिकेने करायला हवा. तो विचार महापालिकेने केला असता तर अंतर्गत गटारे तुंबून त्यातून सांडपाणी बाहेर रस्त्यावर आले नसते. **पावसाळा तोंडावर असतानाही दिव्यातील मुख्य नाल्यांची सफाई न होणे, त्यातील गाळ न काढणे हे कशाचं लक्षण म्हणावं? याला दिवा शहरातील लोकांना गृहीत धरणे असेच म्हणता येईल.**

नालेसफाई नीट न झाल्याने घाणीचे पाणी रस्त्यावर साचू लागले आणि त्यातून नागरिकांना आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला तर त्याला जबाबदार कोण ? याचं उत्तर ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने द्यायला हवं. दिव्यात नालेसफाईत चालढकल करणाऱ्या आणि नालेसफाईच्या नावाने हातसफाई करणाऱ्या ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी.महापालिका आयुक्तांनी याविषयावर स्वतंत्र बैठक आयोजित करायला हवी. दिवावासीयांना स्वच्छतेची हमी देताना नालेसफाई नियमानुसार होईल याकडे लक्ष द्यायला हवे...ठाणे शहराचे प्रशासकीय प्रमुख म्हणून आयुक्त हे करतील,नागरिकांना दिलासा देतील हीच अपेक्षा!

# ठामपात पदोन्नती पाठोपाठ आता रिक्त पदेही भरली जाणार

ठाणे : रिक्त पदांनी नेहमी टीकेचे धनी होण्य्रा ठाणे महापालिका प्रशासनाने टप्प्याटप्प्याने पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. या पदांमध्ये अग्निशमन विभागातील ३८२ आणि अभियांत्रिकी ६६ पदांचा समावेश आहे. त्यामध्ये अग्निशमन विभागात पहिल्या टप्यात १८० फायरमन कायमस्वरुपी घेतले जाणार आहेत. ही रिक्तपदे येत्या काही महिन्यात वाढणार आहे. ठाणे महापालिकेच्या सेवेतून दरमहा २५ ते ४५ कर्मचारी, अधिकारी हे सेवा निवृत्त होत आहेत. त्यात आता मागील कित्येक वर्षापासून महापालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाजयांचा पदोन्नतीचा मार्ग देखील रखडला होता. परंतु मागील तीन ते चार महिन्यापासून हा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानुसार आतापर्यंत १५८ जणांना महापालिकेने पदोन्नती दिली आहे. त्यानंतर आता मागील कित्येक वर्ष रखडलेला भरतीचा मार्ग देखील आता मोकळा झाला असून आकृती बंध मंजुर झाल्यानांतर आता पहिल्या टप्यात अभियांत्रीकीची तसेच अग्निशमन दलातील महत्वाची मानली जाणारी फायरमनची पदे भरण्याची प्रक्रिया अंतिमच टप्यात आली आहे. महापालिकेत आजही कार्यकारी ०५, उप अभियंता (नागरी) ०७, कनिष्ठ अभियंता (नागरी) ७७ आणि कनिष्ठ अभियंता २ ची ६६ पदे रिक्त आहेत. त्यात मागील महिन्यात शहर विकास विभागातील वरीष्ठ अधिकारी सेवानिवृत्त झाले होते. त्यानंतर त्यांच्या कार्यभार कार्यकारी अभियंत्याच्या खांद्यावर आला आहे. त्यातही कनिष्ठ अभियंत्याची पदे हे २०१६ पासून कमी अधिक प्रमाणात रिक्त राहिलेली आहेत. ती देखील भरली गेली नसल्याने त्याचा ताण आता जे कार्यरत कर्मचारी आहेत, त्यांच्यावर येत आहेत. त्यात आरोग्य सेवेतील महत्वाची पदे मागील काही महिन्यापासून टप्पाटप्प्याने भरली जात आहेत. त्यात आता अभियांत्रीकी (कनिष्ठ अभियंता) यांची शिल्लक असलेली ६६ पदे भरली जाणार असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.तर अग्निशमन विभागामधील ३८२ फायरमनची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला असून पहिल्या टप्पात १८० फायरमन कायमस्वरुपी घेतले जाणार आहेत.

अग्निशमन दलातील फायरमन आणि अभियांत्रीकीची ६६ पदे कायमस्वरुपी भरली जाणार आहेत. त्याची प्रक्रिया अंतिम टप्यात आली आहे. येत्या काही महिन्यात भरती प्रक्रियेला प्रत्यक्षात सुरवात होणार आहे.

(गजानन गोदेपुरे - उपायुक्त, आस्थापना विभाग - ठामपा)

## ठाण्यात पोलिस हवालदाराचा अपघाती मृत्यू अपघाताचा दोन महिन्यांनंतर गुन्हा दाखल

**ठाणे:**- भरधाव वेगाने आलेल्या अनोळखी दुचाकीस्वाराने वागळे इस्टेट परिसरात दुचाकीवरून पेट्रोलिंग करण्य्रा पोलिसांना हुलकावणी दिली. याचदरम्यान अपघातात दुचाकीवरून खाली पडून पोलिस हवालदार सचिन खटे आणि पोलिस शिपाई सचिन चव्हाण हे जखमी झाले होते. या अपघातात डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या खटे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी दोन महिन्यांनंतर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १७ मार्च २०२५ रोजी रात्री ठाण्यातील रघुनाथ नगर परिसरात घडली.

सोमवारी (ता.१७ मार्च) रात्री ९ वाजण्याच्या सुमारास पोलिस हवालदार सचिन खटे आणि पोलीस शिपाई सचिन चव्हाण हे दुचाकीवरून पेट्रोलिंग करत होते. ते दुचाकीवरून रहेजा कॉम्प्लेक्सच्या बाजूकडून रघुनाथ नगर येथील संकल्प चौकाच्या दिशेने जात असताना, रघुनाथ नगर बाजूकडून आलेल्या एका अनोळखी दुचाकीस्वाराने त्यांना हुलकावणी दिले. याचदरम्यान खटे यांनी दुचाकी फुटपाथवर चढली. तर दुचाकी फुटपाथवरून पुढे असलेल्या भिंतीला जाऊन धडकली. यावेळी खाली पडलेल्या चव्हाण यांच्या हाताला किरकोळ मुका मार लागला तर खटे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना उपचारार्थ ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथून खटे यांना मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल केले. उपचारादरम्यान २४ मार्च रोजी सकाळी खटे यांना तेथील डॉक्टरांनी मृत घोषित केली. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक शशिकांत जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात अनोळखी दुचाकीस्वारा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वागळे इस्टेट पोलिस करत आहेत.

## गांजा प्रकरणी रिक्षाचालक गजाआड ; लाखोंचा गांजा जप्त

ठाणे: गांजा विक्रीसाठी आलेल्या मोहम्मद फिरोज जन्नत शेख (२७) या रिक्षाचालकाला ठाणे गुन्हे शाखेच्या पथक १ च्या पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून १ लाख १३ हजार ७०० रुपयांचा १ किलो ६६ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली.

साकेत रोड येथे गांजा हा अमली पदार्थ विक्रीसाठी एक २५ ते ३० तरुण येणार असल्याची माहिती ठाणे गुन्हे शाखे १ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन गायकवाड यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या पथकाने सापळा रचून त्याला गुरुवारी रात्री ( ता. २९) अटक केली. यावेळी त्याच्याकडून गांजासह रोख २२० रुपये मिळून आले. अटकेतील शेख हा कळवा शांतीनगर परिसरात राहणारा आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा १ चे पोलिस हवालदार शब्बीर फरास यांनी दिलेल्या तक्रारीनुसार राबोडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कल्याण टोरेस ज्वेलर्स प्रकरण ; १ हजार ४३१ गुंतवणूकदारांची फसवणूक

# अशाप्रकारे फसवणूक झालेल्यांना तक्रार देण्याबाबत पोलिसांचे आवाहन,दोन परदेशी नागरिकांसह सात जणांना अटक

ठाणे: सोन्या-चांदीचे दागीने तसेच हुबेहुब ह्रियांसारखे दिसणारे, प्रयोगशाळेत निर्मात मोजेनाईट खडे त्यांच्या मुळ किमतीपेक्षा कितीतरी पटीने जास्त किंमतीवर ग्राहकांना विक्री करून, दागीने- खडे खरेदी रकमेवर दर आठवडा ४ ते ११ टक्के रक्कम परतावा पुढील ५२ आठवडे देण्याचे आमिष दाखवून लकी ड्रॉ मध्ये गाडी, घर देण्याचे आमिष दाखविण्य्रा सात जणांना ठाणे पोलिसांनी अटक केली आहे. तर आतापर्यंत १ हजार ४३१ गुंतवणूकदारांची सुमारे ११ कोटी १२ लाखांची फसवणूक झाल्याची पुढे आली आहे. ती रक्कम आणि गुंतवणूकदारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशाप्रकारे आणखी काही गुंतवणूकदारांची फसवणूक झाली असेल तर त्या गुंतवणूकदारांनी ठाणे शहर आर्थिक गुन्हे शाखेत तक्रार दाखल करण्यासाठी कागदपत्रांसह पुढे यावे, असे आवाहन ठाणे शहर पोलिसांनी केले आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातील कल्याण खडकपाडा भागात ठटोरेस ज्वेलर्सठ हा ब्रॅन्ड असलेल्या प्लॅटीनम हर्न प्रा.लि. कंपनीने त्यांच्या ज्वेलरी शोरूमच्या आडुन सोन्या-चांदीचे दागीने तसेच हुबेहुब हि-यांसारखे दिसणारे प्रयोगशाळेत निर्मात मोजेनाईट खडे त्यांच्या मुळ किमतीपेक्षा कितीतरी पटीने जास्त किंमतीवर ग्राहकांना विकी करून, दागीने- खडे खरेदी रकमेवर दर आठवडा ४ ते ११ टक्के रक्कम-परतावा पुढील ५२ आठवडे देण्याचे आमिष दाखवुन तसेच लकी ड्रॉ मध्ये गाडी, घर देण्याचे आमीष दाखवत, हजारो ग्राहकांना जास्तीत जास्त रकमेची गुंतवणुक करण्यास सांगितली. त्यानुसार गुंतवणूकदारांना ठरल्याप्रमाणे परतावा न देता त्यांची करोडो रूपयांची फसवणुक केली आहे. याप्रकरणी टोरेस ज्वेलर्स विरूध्द राबोडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१६(२), ३१६ (५), ३१८(४), ३(५), एमपीआडी कलम ३ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आल्यावर सात जणांना अटक केली. तसेच त्यांनी १ हजार ४३१ गुंतवणूकदारांची ११ कोटी १२ लाख ९५ हजार ५४३ रुपयांची आतापर्यंत फसवणूक केल्याची बाब पुढे आली आहे. तसेच अटकेतील सात जणांकडून १२ कोटी ३१ लाख १५ हजार ६१२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. यामध्ये त्यांचे बँक खाते गोठविण्यात आले आहेत. तसेच त्या सात जणांविरोधात ठाण्यासह मुंबई, नवीमुंबई आणि मीरा भाईंदर पोलीस दलात गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याप्रकरणी दोन परदेशी नागरिक अटकेत...

याप्रकरणी आतापर्यंत ठाणे पोलिसांनी सात जणांना अटक केली आहे. यामध्ये तीन महिलांचा समावेश आहे. याशिवाय दोन परदेशी नागरिक आहेत. सद्यास्थितीत ते सर्व न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या फसवणुकीच्या गुन्ह्यातील सर्वाधिक गुंतवणूकदार हे कल्याण परिसरातील आहेत. तसेच कल्याणच्या आजुबाजूच्या परिसरातील नागरिकांचीही अशाप्रकारे फसवणूक झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांकडून तक्रार दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर, फसवणूक झालेल्या नागरिकांनी कागदपत्रे सादर करून तक्रार करण्यासाठी पुढे यावे . ठ-दत्तात्रय पाबले , सहायक पोलिस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींवर नर्मदेचा जलाभिषेक

## इंदोरच्या होळकर संस्थानकडून जलाभिषेकचा ठाण्यालाही मान

**ठाणे :-** देशभरातल्या प्रमुख मंदिरांच्या जिर्णोद्धार करण्प्रया पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आज ३०० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. धनगर प्रतिष्ठान व धनगर प्रतिष्ठान महिला मंडळाच्या वतीने ठाण्यातील मासुंदा तलाव परिसरात असलेल्या अहिल्यादेवी यांच्या मूर्तीवर नर्मदेच्या जलाने अभिषेक करण्यात आला. आहिल्यादेवी यांचे वंशज इंदोरच्या होळकर संस्थानचे श्रीमंत राजे यशवंतराव होळकर यांनी देशभरातील अहिल्यादेवी यांच्या प्रतिमांचे नर्मदेने जलाभिषेक व्हावा, यासाठी नर्मदा तीर्थ पाठविण्यात आले होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जंयतीनिमित्त महेश्वर राजगादी येथून देशभरातील अहिल्यादेवींच्या प्रतिमांचे नर्मदेच्या तिर्थाने अभिषेक व्हावा, यासाठी नर्मदा तिर्थ पाठविण्यात आले होते. राज्यात सांगली, पुणे,माळेगाव बारामती, पंढरपूर, चौंडी, ठाणे,औंढा नागनाथ, अंबड आदी ठिकाणी हे तीर्थ पोहचले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या दैनंदिन दिनश्चर्येत नर्मदा स्नानाचा उल्लेख सापडतो इतिहासातील हा सांस्कृतिक धागा पकडुन युवराज श्रीमंत यशवंतराव होळकर यांनी नर्मदा तिर्थ धनगर प्रतिष्ठान यांना पाठवले असून यंदाची जयंती वेगळ्या पद्धतीने साजरी झाली. ठाण्यातील मासुंदा तलाव येथे आहिल्यादेवीच्या मूर्तीवर शनिवारी सकाळी प्रसिद्ध उद्योजक संदेश कवितके व सौ काजल कवितके यांच्या हस्ते नर्मदा तीर्थानने अभिषेक घालून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महावितरणचे संचालक मुरहरी केळे, डॉ अशोक माने,समाजाचे ज्येष्ठ नेते रमेश तोंडे शिवसेना उपविभाप्रमुख राजेंद्र देसाई,वकील नानासाहेब मोटे, पंढरीनाथ चोरमले, उद्योजक सुरेश शिंगाडे, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे सहाय्यक आयुक्त सोपान भाईक, उपायुक्त श्री गोदापुरे, जनसंपर्क अधिकारी रोशना मंचेकर,ठाणे धनगर प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक कुरकुंडे,धनगर प्रतिष्ठान महिला मंडळाच्या अध्यक्षा माधवी बारगीर उपस्थित होत्या.




हा जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी कार्याध्यक्ष महेश गुंड,सचिव तुषार धायगुडे ,खजिनदार अनिल जरग,उपाध्यक्ष कुमार पळसे,राजेश वीरकर,प्रचारप्रमुख सचिन बुधे,उपखजिनदार सुरेश भांड,सल्लागार दिलीप कवितके, सूर्यकांत रायकर,मनोहर वीरकर,प्रसाद वारे,कार्यकारणी सदस्य गणेश बारगीर,अविनाश लबडे,राजेश वारे,दीपक झाडे,संतोष बुधे,संतोष दगडे,उत्तम यमगर,अंकुश उघाडे,प्रमोद वाघमोडे,उद्धव गावडे,महेश पळसे,अनिकेत पाडसे,आर्यन गुंड, साई बुधे,महिला मंडळाच्या उपाध्यक्ष संगीता खटावकर,सचिव गायत्री गुंड,खजिनदार भारती पिसे,उपसचिव सुजाता भांड,उपखजिनदार सुषमा बुधे,सल्लगार मीना कवितके,सदस्य शीतल डफळ,वंदना वारे,अमृता बुधे,सीमा कुरकुंडे,मनीषा शेळके,रंजना यमगर,स्मिता गावडे,शुभांगी उघाडे,रिचा कुलाळ,सुजाता बुधे आदींसह कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

# दिव्यातील टाटा पावर रोडची दुरावस्था, रस्ता दुरुस्त करण्याची शिवसेना ठाकरे गटाची मागणी

**दिवा:-** बी.आर नगर भागातील टाटा पावर रोड हा दातिवली आगासन कडे जाण्प्रया नागरिकांना शीळ फाट्याकडून कडून येताना जवळचा रस्ता आहे.मात्र चिखलामुळे या रस्त्याची वाताहत झाली असून पालिका प्रशासनाचे या रस्त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. या रस्त्याची तातडीने डागडुजी करण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपशाखाप्रमुख विलास उतेकर यांनी केली आहे. मुख्य मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून या मार्गाने अनेक वाहने ये जा करतात.परंतु या रस्त्यावर खड्डे, चिखलाचे साम्राज्य असून वाहनांना व स्थानिक लोकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.बहुतांश कामगार वर्ग या रस्त्यावरून ये जा करत असतात.आधिच हा रस्ता खराब असल्याने लोकांना व वाहनांना या रत्यावरुन ये जा करण्यास अडचण होत होती.लोक व वाहने या रस्त्याने कशी जाणार ? असा सवालही उतेकर यांनी विचारला आहे.



# ट्रक दुभाजकाला धडकून रस्त्यावर पसरले ऑईल ; वाहतुकीवर परिणाम



**ठाणे:-** घोडबंदर रोडने ठाण्याकडे येण्प्रया वाहिनीवरील मानपाडा उड्डाणपुलाजवळील दुभाजकाला ट्रक जाऊन धडकला. या अपघातात ट्रक मधील ऑईल रस्त्यावर पसरल्याने त्याचा परिणाम वाहतुकीवर झाला. ही घटना शनिवारी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. जवळपास पाच तासांनी अपघातग्रस्त ट्रक तेथून हलविण्यात आला. तर या अपघातानंतर ट्रक चालकाने तेथून पळून गेला. ठाण्याकडे येण्प्रया वाहिनीवरील मानपाडा उड्डाणपुलाच्या दुभाजकाला ट्रक धडकून रस्त्यावर ऑईल पसरले आहे. अशी माहिती वाहतूक पोलीस काकडे यांनी ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. वाहतुकी पोलिसांसह आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी ट्रक मध्ये कोणी नव्हते. तसेच ही घटना शनिवारी पहाटे साडे पाच वाजण्याच्या सुमारास घडली होती. तसेच चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला असावा असा कयास वाहतूक पोलिसांकडून वर्तविण्यात आला आहे. तर अपघातग्रस्त वाहन शहर वाहतूक विभागाचे कर्मच्प्रयांच्या उपस्थितीमध्ये २ क्रेनच्या साह्याने रोडच्या एका बाजूला करण्यात आले. तोपर्यंत सकाळचे १० वाजले होते. त्यानंतर रस्त्यावर पसरलेल्या ऑईलवर आपत्ती व्यवस्थापन कर्मच्प्रयांनी माती पसरविण्यात आल्यावर घोडबंदर रोड वाहतुकीसाठी पूर्णपणे मोकळा करण्यात आला. अशी माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

# ठाणे महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना वारसा हक्काने नियुक्तीचे आदेश निर्गमित

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार नरेश म्हस्के यांच्या पाठपुराव्याला यश सफाई कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**ठाणे:-** ठाणे महापालिकेतून सेवा निवृतत, स्वेच्छा निवृत्त तसेच मयत झालेल्या सफाई कामगारांच्या वारसाहक्काने महापालिकेच्या सेवेत येणाऱ्या १५ जणांचे नियुक्ती आदेश आज प्रशासनाने निर्गमित केल्याने सर्व सफाई कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्क लागू व्हावा यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार नरेश म्हस्के यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्क मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून प्रलंबित वारसा हक्काच्या नियुक्ती तातडीने करावयात असे निर्देश खासदार नरेश म्हस्के यांनी प्रशासनाला दिले आहेत .
ठाणे महापालिकेतील जे सफाई कर्मचारी सेवानिवृत्त, मयत वा ज्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड- पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्क लागू होतो, त्या अन्वये त्यांना महापालिकेच्या आस्थापनेवर सफाई कर्मचारी या संवर्गात नियुक्तीची तरतूद आहे. या बाबत सर्व सफाई कर्मचारी यांना वारसा हक्क देणेबाबत या माहे फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयास मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे आव्हानित करण्यात आले होते. या रिट याचिकेमध्ये ८ जानेवारी २०२५ मध्ये जे स्थगिती आदेश आहेत ते मा. उच्च न्यायालयाने उठवून वारसा हक्काने सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती आदेश देणेबाबत शासनाने निर्देश दिले .या निर्णयाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व वित्त मंत्रालयाने यांनी जानेवारी २०२५ अखेरीस सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्य वारसांना नियुक्ती आदेश देणेबाबत आदेश दिले आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार नरेश म्हस्के यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे शासनस्तरावरुन सफाई कर्मचाऱ्यांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याचा मार्ग मोकळा झाला. याबाबत आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनानुसार ठाणे महापालिका प्रशासनाने विशेष मोहिम राबवून महापालिकेतील जे सफाई कर्मचारी सेवा निवृत्त, स्वेच्छा निवृत्ती तसेच मयत झाले आहे अशा सफाई कर्मचाऱ्यांच्या १५ वारसांचे आदेश आज (३०.०५.२०२५) प्रशासनाकडून निर्गमित करण्यात आले. तसेच उर्वरित सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांचे नियुक्तीचे आदेश लवकरात लवकर काढावेत असे निर्देश खासदार नरेश म्हस्के यांनी प्रशासनाला दिले आहेत . आज झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसाच्या नियुक्तीमुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांनी उपमख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार नरेश म्हस्के, महापालिका आयुक्त सौरभ राव व प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

# मुंब्रादेवी कॉलनी रोडवरील फेरीवाले हटवा, शिवसेना ठाकरे गटाची मागणी



**दिवा:-** मुंब्रादेवी कॉलनी रोड वरील फेरीवाले हटवण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कल्याण ग्रामीण विधानसभा संघटिका योगिता नाईक यांनी पालिकेकडे केली आहे . मुंब्रादेवी कॉलोनी रहिवाशांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे दातिवली शाखेला भेट देऊन मुंब्रादेवी कॉलोनी मधील फुटपाथवर चालण्यासाठी जागा नसल्याची समस्या मांडली असता विधानसभा संघटिका सौ.योगिता नाईक यांनी दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद यांची भेट घेऊन निवेदन दिले.याबाबत सहाय्यक आयुक्तांनी ही सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले. सहाय्यक आयुक्तांकडे मुंब्रादेवी कॉलनी मधील फुटपाथ लवकरात लवकर खाली करून नागरिकांना चालण्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. फेरीवाल्यांनी संपूर्ण रस्ता व्यापले असल्याने नागरिकांना चालण्याची अडचण होते.या गोष्टीकडे योगिता नाईक यांनी लक्ष वेधून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# विकसित कृषी संकल्प अभियानाचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

ठाणे :- ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात विकसित कृषी संकल्प अभियानाचे दि.२९ मे ते दि. १२ जून २०२५ या कालावधीत १५ दिवस राबविण्यात येणाऱ्या अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते आज हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.
यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश इंगोले, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषी विज्ञान केंद्र ठाणे, डॉ. सुरेश जगदाळे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे विषय तज्ञ डॉ. सलील हंडे, डॉ.मयुरा गोळे, डॉ.संग्राम चव्हाण, डॉ.संजय कदम, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, तहसिलदार रेवण लेंभे, तहसिलदार सचिन चौधर व अन्य कर्मचारी उपस्थित होते.
या कार्यक्रमाप्रसंगी शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ होण्यासाठी शेतकऱ्यांसाठी बनविलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते संपन्न झाले. विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत दि.२९ मे २०२५ ते दि. १२ जून २०२५ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या ९० गावांमध्ये मुरबाड, कल्याण, शहापूर, भिवंडी, अंबरनाथ तालुक्यातील दररोज ६ गावांमध्ये शेतकऱ्यांच्या घरोघरी जावून भेट घेण्यात येणार आहे. या शेतकऱ्यांना



ही माहिती पुस्तिका देण्यात येणार आहे.
या पुस्तिकेमध्ये शेळीपालन, मूर घास कसा बनवावा, यशस्वी दुग्धव्यवसाय शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत, संकरित चारा लागवड कसा करावा, परंपरागत कृषी विकास योजना, सेंद्रिय शेतीकरिता जैविक खते व पीक संरक्षण औषधे, शास्त्रोक्त पध्दतीने वासरांचे आहार व्यवस्थापन, निकृष्ठ चाऱ्याची प्रत वाढविण्यासाठी खाद्य प्रक्रिया तंत्रज्ञान, लंपी चर्मरोगग्रस्त जनावरांची करावयाची सुश्रुषा, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प कृषी मूल्य साखळी विकासाचा उपक्रम, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान) योजनेचे स्वरुप, ?ग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मिळणार ओळख क्रमांक आदी विषयक माहिती शेतकऱ्यांना होण्यासाठी जनजागृती वाहनांद्वारे प्रसिध्दी करण्यात येत आहे.
या मोहिमेची मुख्य वैशिष्टे समृध्द शेतकरी राष्ट्रीय अभियानामध्ये खरीप पिकांसाठी नवीनतम तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देणे, नैसर्गिक (सेंद्रिय) शेती पध्दतींना प्रोत्साहन देणे, माती आरोग्य कार्डावर आधारित पीक निवडीचे मार्गदर्शन करणे, खतांचा संतुलित वापर करण्यास प्रोत्साहन देणे, आयसीटी साधने आणि आधुनिक उपकरणांचा वापर करुन स्मार्ट शेतीला प्राधान्य देणे, शेतकऱ्यांपर्यंत सरकारी योजनांची व्यापक पोहोच सुनिश्चित करणे, वृषी ड्रोनचे थेट प्रात्यक्षिक, पीक विविधीकरण आणि यंत्रावर आधारित शेतीचे मॉडेल, शेतकरी आणि कृषी शास्त्रज्ञांमधील थेट संवाद, शेतकऱ्यांच्या नवोपक्रमांना प्रोत्साहन आदी विषयांवर शेतकऱ्यांसाठी ही जनजागृती सुरु आहे.

# ठामपाचे १२ कर्मचारी, अधिकारी झाले सेवानिवृत्त

ठाणे : ठाणे महापालिकेमार्फत सेवेतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली जात असतांना दुसरीकडे पालिकेच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मे अखेरीस एकाच दिवशी तब्बल १२ कर्मचारी, अधिकारी पालिकेच्या सेवेतून निवृत्त झाले आहेत. मागील काही महिन्यापासून सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे.
ठाणे महापालिकेचे मे महिन्यात सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये एक कार्यालयीन अधीक्षक, चार उप कार्यालयीन अधिक्षक, उपअभियंता, दोन कार्यकारी अभियंता, चार मुख्याध्यापक, चार प्राथमिक शिक्षक, उपशिक्षिका, लिपीक, अग्निशमन, प्रस्ताविका, वाहनचालक, जमादार, शिपाई, माळी, स्लुसमन, आया, वॉड बॉय, बिगारी, सफाई कामगार आणि फिल्ड वर्कर आदींचा समावेश आहे.
ठाणे महापालिकेच्या सेवेत २०१५ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत १७०० हून अधिक कर्मचारी, अधिकारी सेवा निवृत्त झाले आहेत. त्यात २०२५ सुरु होताच, पहिल्याच महिन्यात २५ कर्मचारी, अधिकारी हे सेवानिवृत्त झाले होते. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात त्यात आणखी २७ जणांची भर पडली आहे. याचाच अर्थ दोन महिन्यात ५२ अधिकारी कर्मचारी सेवा निवृत्त झाल्याने महापालिकेत आणखी पोकळी वाढत जात आहे. त्यात दरमहा हा आकडा २५ ते ३० च्या आसपास असतांनाच मे महिन्यात एकाच दिवशी तब्बल १२ जण सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. दर महिना हा आकडा वाढतांना दिसत आहे.

# प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया मध्ये सदस्य म्हणून खासदार नरेश म्हस्के यांची नियुक्ती

**ठाणे / नवी दिल्ली :-** शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांची लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या वतीने प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया मध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार नरेश म्हस्के यांच्या नियुक्तीने ठाण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाच्या तीन सदस्यांच्या नावांची घोषणा मंगळवारी रात्री उशिरा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केली. खासदार नरेश म्हस्के यांच्यासह कालिचरण मुंडा, संबित पात्रा यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया ही संस्था देशातील पत्रकारितेच्या नैतिक मूल्यांचे संरक्षण करणारी, प्रसारमाध्यमांवर देखरेख ठेवणारी आणि पत्रकारांना योग्य मार्गदर्शन करणारी एक महत्वाची संविधानिक संस्था म्हणून कार्यरत आहे. नरेश म्हस्के यांच्यासारख्या अभ्यासू नेतृत्वाची आणि वक्तृत्वाची या परिषदेवर नियुक्ती झाल्याने लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला निश्चितच नवे बळ मिळेल, असा



विश्वास शिवसेना गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला आहे.खासदार नरेश म्हस्के यांना नुकताच 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर आहे. खासदार नरेश म्हस्के हे महत्वपूर्ण केंद्रीय गृहनिर्माण व नागरी व्यवहार समितीच्या स्थायी समितीचे सदस्य तसेच वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ छाननीसाठी नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समिती सदस्य, रेल्वे सल्लगार समिती सदस्य, हिंदी भाषा सल्लागार समिती, पोस्ट आणि दूरसंचार मंत्रालय सल्लागार समिती सदस्य म्हणून कामकाज पाहत आहेत. आपल्या खासदारकीच्या पहिल्याच टर्म मध्ये अवघ्या काही महिन्यातच संसदेतील महत्वपूर्ण पदे भूषवित असल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

शिवसेना मुख्यनेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा भरभक्कम पाठिंबा, शिवसेना गटनेते खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी केलेले मार्गदर्शन, दिलेले प्राधान्य यामुळेच मला संसदेत काम करण्याची ऊर्जा मिळत आहे. या दोन्ही नेत्यांसह मला मोठ्या मताधिक्याने संसदेत पाठवणारा मतदार राजा, महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते, महिला आघाडी, शिवसैनिकांचे हे यश असल्याची प्रतिक्रिया नरेश म्हस्के यांनी दिली आहे .

## डिजिटल प्लॅटफॉर्म आणि ॲप्सवर नामांतर झालेल्या स्थानकांची नावे व कोड बदला -खा.नरेश म्हस्के

ठाणे - महायुती सरकारने राज्यातील संभाजीनगर, धाराशिव, अहिल्यानगर या तीन ऐतिहासिक शहरांचे नामांतर केले आहे. मात्र अद्यापही रेल्वेच्या कामकाजात जुन्या नावांचा वापर केला जात आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म आणि ॲप्सवर नवीन स्थानकांची नावे तसेच कोड बदलण्याची सूचना ठाणे लोकसभेचे खासदार, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक यांना पत्राद्वारे केली आहे.

महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन राज्यातील तीन शहरांची नावे बदलली आहेत. त्यानुसार रेल्वे स्थानकांची कोड, डिजिटल प्लॅटफॉर्म, रेल्वे ॲप्स आणि संबंधित सर्व प्रणालींमध्ये ही नवीन नावे देखील बदलण्याची गरज असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

औरंगाबादचे संभाजीनगर नवीन नाव : संभाजीनगर ; उस्मानाबादचे स्टेशन कोडः ळश्ऊ) नवीन नाव : धाराशिव ; अहमदनगरचे नवीन नाव : अहिल्यानगर या बदलांचा समावेश करण्यात यावा.

रेल्वेच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर (उदा. ॲप, वेबसाइट, तिकीट बुकिंग सिस्टम इत्यादी) ही नावे आणि कोड अजूनही जुन्याच स्वरूपात दिसत आहेत. यामुळे प्रवाशांचा गोंधळ उडत असून नवीन नावांचा स्वीकार करण्यात अडचणी येत आहेत. तरी वरील नावे आणि त्यांचे स्टेशन कोड रेल्वेच्या सर्व डिजिटल प्लॅटफॉर्मवर तात्काळ अद्ययावत करण्याकरिता सूचना संबंधितांना द्याव्यात यामुळे महाराष्ट्रातील प्रवाशांना सुविधा होईल तसेच राज्य सरकाच्या निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल, अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली आहे.

ठाण्यातील मनसेचे कार्यकर्ते सुशांत डोंबे यांनीही अशाप्रकारची मागणी खासदार नरेश म्हस्के यांना पत्र देऊन केली होती.

# उपशिक्षकांना मुख्याध्यापक तसेच, वरिष्ठ लिपिकांना कार्यालयीन उपअधिक्षक पदावर पदोन्नती

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे कर्मचारी आणि शिक्षकांनी मानले आभार

**ठाणे :-** ठाणे महानगरपालिकेतील शिक्षक आणि कर्मचारी यांच्या पदोन्नतीबाबत निर्णय घेण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मान्यतेने बुधवारी ठाणे महानगरपालिकेच्या सेवेतील ३८ उपशिक्षक (प्राथमिक विभाग, मराठी माध्यम) आणि ५३ वरिष्ठ लिपिकांची पदोन्नती करण्यात आली. प्राथमिक विभागातील (मराठी माध्यम) ३८ उपशिक्षकांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. तर, ५३ वरिष्ठ लिपिकांना कार्यालयीन उपअधिक्षक पदावर पदोन्नती करण्यात आली आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या ३८ उपशिक्षक आणि ५३ वरिष्ठ लिपिकांची पदोन्नतीचे आदेश अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी बुधवारी काढले. त्यापूर्वी, मंगळवारी, वरिष्ठ लिपिक या पदावर ४६ जणांना, अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) या पदावर १९ जणांना, तर सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर ०२ जणांना पदोन्नती देण्यात आली. आतापर्यंत एकूण १५८ जणांना पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नतीच्या या निर्णयांमुळे महापालिका कर्मचारी, शिक्षक यांच्यात आनंदाचे वातावरण असून त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे आभार मानले आहेत.

आठ ते दहा वर्षांच्या कालावधीमध्ये अनेक अधिकारी- कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे अनेक पदे रिक्त होती. महापालिकेच्या कामाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असून रिक्त पदांवरील पदोन्नती तातडीने होऊन नागरीकांना सुविधा देण्याचे कामकाज प्रभावीपणे व्हावे व कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढावे यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनास सूचना केली होती. त्यानुसार, वरिष्ठ लिपिकांना कार्यालयीन उपअधिक्षक पदावर शासकीय निकषांनुसार तीन वर्षांच्या विहित मुदतीत पदोन्नती देण्यात आली आहे.

पदोन्नतीबाबतचे हे सूत्र राबविण्यात आल्याने ठाणे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये

**ठाणे महापालिकेच्या ३८ उपशिक्षक आणि ५३ वरिष्ठ लिपिक यांना मिळाली पदोन्नती**
**महापालिका कर्मचारी आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण**

आनंदाचे वातावरण आहे. त्याचा त्यांच्या कामकाजावर सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे.

त्याचप्रमाणे, या संदर्भात, काही पदोन्नत्तींबाबत शासनाकडून सुस्पष्ट आदेश प्राप्त झाले. त्यामुळे, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांच्या पदोन्नत्ती करणायासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश आस्थापना विभागाला दिले होते. त्यानुसार, मंगळवारी एकूण ६७ कर्मचारी आणि बुधवारी एकूण ९१ कर्मचारी यांच्या पदोन्नती करण्यात आल्या आहेत. या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पदस्थापना लवकरच होणार, असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# खिचडी, बॉडीबॅग खरेदीत घोटाळा करणारेच खरे भ्रष्टाचारी

## शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांचा उबाठावर हल्लाबोल

**ठाणे:**-कोविड काळात खिचडीमध्ये घोटाळा, बॉडीबॅग खरेदीमध्ये घोटाळा करणारे खरे भ्रष्टाचारी असून त्यांना शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका टीपण्णी करण्याचा अधिकार नाही, असा हल्लाबोल शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी आज उबाठा गटावर केला. ठाण्यातील आनंद आश्रम येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. खासदार म्हस्के म्हणाले की, आपण महापौर असताना ठाणे महापालिकेने कोरोना काळात ३५० रुपयांनी बॉडीबॅगची खरेदी केली मात्र त्याच कंपनीची बॉडीबॅग मुंबई महापालिकेने ७००० रुपयांना खरेदी केली. खिचडी घोटाळ्यात सूरज चव्हाण जेलमध्ये गेला. तो कोणाचा मित्र आहे. पत्रचाळ घोटाळ्यात संजय राऊत जेलमध्ये गेले. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांना शिंदे यांच्यावर बोलण्याचा आणि टीका करण्याचा अधिकार नाही, असे खासदार म्हस्के यांनी खडसावले. महाविकास आघाडी सरकारमध्ये मुंबईच्या नियोजन बैठकीत नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना डावलले जात होते, असा गौप्यस्फोट खासदार म्हस्के यांनी यावेळी केला. यासंदर्भात संजय राऊत यांच्याकडे विचारले असता मुंबई महापालिका हा विषय ठाकरे फॅमिलीचा आहे, सर्व निर्णय ठाकरे फॅमिली आणि मित्र परिवार घेणार, एकनाथ शिंदेंना सांग मुंबई महापालिकेत लक्ष घालू नका, हा माझा निरोप दे, असे वक्तव्य राऊत यांनी केल्याचा दावा खासदार म्हस्के यांनी केला.

खासदार म्हस्के म्हणाले की, संजय राऊत यांनी धर्मवीर आनंद दिघे यांचा कायम द्वेष केला. राऊत यांच्या मुलाखतीमुळेच दिघे यांना टाडा लागला. त्यामुळे राऊत यांच्या स्वप्नात धर्मवीर आनंद दिघे जाणे कधीच शक्य नाही, असे खासदार म्हस्के म्हणाले. याउलट हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे आपल्या स्वप्नात आले होते, असे खासदार म्हस्के म्हणाले. बाळासाहेबांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुसळधार पावसातही मुंबई आणि ठाण्यात केलेल्या कामाचे कौतुक केले, असे खासदार म्हस्के म्हणाले. एकनाथ शिंदे भरपावसात धावपळ करत आहेत मात्र माझ्याच जिवावर मोठे झालेले, खासदारकी मिळवणारे, इतकी वर्ष मुंबई महापालिकेची सत्ता उपभोगणारे घरकोंबड्यासारखे घरात बसलेत. समाजकारणाचे मी दिलेल्या तत्वाचे पालन करत नाहीत, हे माझे शिष्य होते याची मला लाज वाटते, याउलट एकनाथ शिंदे यांचा गर्व वाटतो, असे उद्गार बाळासाहेबांनी काढले. पाकिस्तानची भाषा संजय राऊत बोलतोय, पाकिस्तानची बाजू घेतोय मी जर असतो तर ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी स्वतः मुंबईत बोलावून सत्कार केला असता. आपली लोकं पाकिस्तानची भाषा बोलतात त्यांना हिंदुस्थानच्या जनतेने जोड्याने हाणले पाहिजे, अशी वक्तव्य बाळासाहेबांनी स्वप्नात येऊन केली, असे खासदार म्हस्के म्हणाले.महाविकास आघाडी सरकारच्या काळात उबाठाला दिल्लीत सोनिया गांधी आणि राहुल गांधी घराबाहेर ताटकळत ठेवायचे. तेव्हा ते कोणाचे लांगुलचालन करायचे सर्वांनी बघितले आहे. याउलट नुकताच केंद्रात झालेल्या एनडीएच्या घटक पक्षांच्या बैठकीत ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लष्कराचे अभिनंदव करण्याचा ठराव शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्याचा मान एनडीए नेतृत्वाने दिले. परदेश दौऱ्यावर गेलेल्या खासदारांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची संधी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना देण्याचे काम एनडीएने केले, हा महाराष्ट्राचा सन्मान आहे, असे खासदार म्हस्के म्हणाले. याउलट लांगुलचालन आणि दरवाजाबाहेर उभ राहण्याचे काम संजय राऊत आणि मंडळी करत आहेत, अशी टीका खासदार म्हस्के यांनी केली.

# सुरक्षित प्रवासासाठी आता 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली असलेल्या स्मार्ट बसेस - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे:**- राज्य परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली स्मार्ट बसेस मध्ये लावण्यात येणार असल्याने या नवीन बसेस प्रवासासाठी अधिक सुरक्षित असतील असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे व्यक्त केला.

एसटी महामंडळाच्या ठाणे-नागपूर दरम्यान चालवण्यात येणाऱ्या 'स्मार्ट बस'मध्ये बसवण्यात आलेल्या आयटी सुरक्षा प्रणालीची पाहणी उपमुख्यमंत्र्यांनी आज ठाणे येथे केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, एसटीचे अधिकारी उपस्थित होते.



ठाणे येथे उपमुख्यमंत्र्यांकडून एसटीच्या स्मार्ट बसची पाहणी

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सध्या दररोज सरासरी ५५ लाख प्रवाशांना दळणवळण सेवा देणाऱ्या एसटी बसमधील प्रवास अधिकाधिक सुरक्षित झाला पाहिजे. या उद्देशाने एआय तंत्रज्ञानावर आधारित ठ एकात्मिक सुरक्षा प्रणाली ठ नव्या बसेसमध्ये लावण्यात येणार आहे.

चालकाच्या बस चालवण्याच्या पद्धती पासून बसमध्ये बसलेल्या प्रवाशांच्या हालचालीवर देखरेख करणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्या सोबतच वायफाय, एलईडी स्क्रीन, जीपीएस प्रणाली सह फोम बेस आग प्रतिबंधक प्रणाली देखील बसविण्यात येणार आहे. या उपकरणामुळे महिलांना सुरक्षितरीत्या प्रवास करता येणे शक्य होणार असून, चालकाला गाडी चालवणे अधिक सोपे होणार आहे. तसेच त्याने मद्यपान केले असले किंवा त्याला झोप येत असली तरीही सायरनद्वारे लगेच कळणार असल्याने प्रवाशांना सुरक्षितरीत्या प्रवास करता येणे शक्य होणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. परिवहन मंत्री सरनाईक यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे ही प्रणाली बसविण्यात येत आहे. त्यांनी भविष्यातील बदलांचा विचार करून एसटीमध्ये अमुलाग्र बदल करण्याचा ध्यास घेतला आहे, असे कौतुकोद्गार उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

परिवहन महामंडळाच्या या 'स्मार्ट बस'मध्ये प्रगत चालक सहाय्यक प्रणाली आणि चालक निरीक्षण कॅमेरे बसवण्यात आले आहेत. तसेच ३६० अंशातील सर्व माहिती चालकाला देणारे ब्लाइंड स्पॉट कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

याशिवाय प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बसमध्ये प्रवासी भागात दोन, समोर आणि पाठीमागे प्रत्येकी एक कॅमेरा बसवण्यात आला आहे. तसेच चालक सहाय्यक स्क्रीन, मोबाईल जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, एलसीडी स्क्रीन आणि सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

# आगीत ५ भंगार गोडाऊन जळून खाक कोणतीही जीवितहानी नाही

**ठाणे:**- ठाण्याच्या शीळ येथील दोस्ती कॉम्प्लेक्स जवळील बबलू कंपाऊंड मधील भंगाराच्या गोडाऊनला आग लागली. त्या आगीत ०५ गोडाऊन जळून खाक झाले असून ही घटना शुक्रवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या आगीवर तब्बल सहा तासांनी नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.शीळ येथील बबलू कंपाऊंड येथे तात्पुरत्या स्वरूपात पत्र्याचे गोडाऊन उभारण्यात आले होते. त्या गोडाऊनला शुक्रवारी रात्री आग लागली होती. आगीने क्षणात रुद्र रूप धारण केले. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल आणि डायघर पोलिसांनी धाव घेतली. तातडीने अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. तेंव्हा कुठे आग शनिवारी पहाटे सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास पूर्णपणे नियंत्रणात आली. या आगीच्या घटनेत पाच भंगाराचे गोडाऊन जळून खाक झाले आहेत. तीन गोडाऊन मालकांची ओळख पुढे आली असून दोन गोडाऊन मालकांची ओळख पुढे आलेली नाही. तसेच यावेळी, ०२ फायर वाहन, ०१- वॉटर टँकर आणि ०१ रेस्क्यू वाहन पाचारण करण्यात आले होते. सुदैवाने आगीत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

# महापालिकेच्या विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती

## कर्मचाऱ्यांनी मानले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे आभार

**ठाणे** :- ठाणे महानगरपालिका ही नागरिकांना सेवा देणारी स्थानिक स्वराज्य संस्था असून या मार्फत नागरिकांना मिळण्याऱ्या सेवा या अधिक जलद मिळण्याकरिता व कामकाजात सुसूत्रता यावी यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी कर्मचारी यांच्या पदोन्नतीकरिता विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी महापालिकेतील अधिकारी कर्मचारी यांना पदोन्नती देण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार वरिष्ठ लिपिक या पदावर ४६, अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) या पदावर १९ जणांना तर सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर ०२ जणांना पदोन्नती देण्यात आली असून प्रशासनाच्या या निर्णयामुळे कर्मच्रायांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मागील काही वर्षाच्या कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त होणारे शासन निर्णय व न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता करुन कार्यवाही करावयाची असल्यामुळे या पदोन्नती करण्यास विलंब होत होता. मात्र काही पदोन्नत्यांबाबत शासनाकडून सुस्पष्ट आदेश प्राप्त होताच महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अधिकारी कर्मचारी यांच्या पदोन्नत्या करणेबाबत विशेष ड्राईव्ह घेण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले होते. त्यानुसार आज महापालिकेने निर्गमित केलेल्या आदेशामुळे पदोन्नत्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

मागील आठ ते दहा वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक अधिकारी- कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे अनेक पदे रिक्त होती. महापालिकेच्या कामाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असून रिक्त पदांवरील पदोन्नती तातडीने होऊन कामकाज प्रभावीपणे व्हावे व कर्मच्रायांचे देखील मनोबल वाढावे यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनास सूचना केली होती. त्यानुसार आज विविध संवर्गातील कर्मच्रायांना अतिरिक्त आयुक् ?त (२) प्रशांत रोडे यांनी पदोन्नतीचे आदेश दिले असून लवकरच त्यांची पदस्थापना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. तर आगामी काळामध्ये उर्वरित रिक्त पदांवर देखील पदोन्नतीबाबत निर्णय घेवून तसे आदेश पारित करणार असल्याचे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले.

आज पारित करण्यात आलेल्या पदोन्नतीमध्ये वरिष्ठ लिपिक या पदावर ४६, अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) या पदावर १९ जणांना तर सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर ०२ जणांना पदोन्नती देण्यात आली. या पदोन्नतीमुळे महापालिका कर्मच्रायांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व कर्मच्रायांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापालिका आयुक्त सौरभ राव व प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

# ठाण्यात कोरोना रुग्णांची संख्या झाली १०० नंबरी

### ३५ रुग्णांचे पाच दिवसांचे गृह विलगीकरण पूर्ण

**ठाणे** :- ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात कोरोना रुग्णांची संख्या ही शंभरी नंबरी झाली आहे. शनिवारी ०९ रुग्ण आढळून आल्याने रुग्ण संख्या १०३ झाली असून त्यापैकी ३५ रुग्णांचे पाच दिवसांचे गृह विलगीकरण पूर्ण झाले आहे. तर ५१ रुग्णांवर गृह विलगीकरणात उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर आहे. तर १६ रुग्ण हे रुग्णालयात उपचारार्थ दाखल असून त्यांचीही प्रकृती स्थिर आहे. यामध्ये १३ रुग्ण खासगी तर ०३ रुग्ण कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आहेत. अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली.



# याला नालेसफाई म्हणायचे का?





दिवा शहरातील नालेसफाईचे सध्याचे चित्र

फोटो-सुदेश सकपाळ



